*Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's*
**C. K. THAKUR VIDYALAYA, NEW PANVEL**
**ENGLISH MEDIUM - SECONDARY SECTION**
**Plot: 8, Sector: 14, Janardan Bhagat Marg CIDCO Colony, New Panvel, TN: 27463729, E-mail: ckteshm@gmail.com**
School Code / Index: (1) HSE & NTSE: **1403039**; (2) U-DISE: **27240818843**; (3) SSC: **17.01.017**

Date: 17/07/2025

## ''सी. के. ठाकूर विद्यालयात गुरू वंदन आणि छात्र अभिनंदन कार्यक्रम उत्साहात''

भारत विकास परिषद पनवेल शाखेतर्फे सी. के.टी संकुलात आज दि. १७ जुलै २०२५ रोजी ''गुरू वंदन, शिष्य अभिनंदन'' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरूवात वंदे मात्रम ने करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन भारत विकास परिषदेचे संस्थापक श्री. समुद्रे सर आणि त्यांचे सहकारी यांनी केले होते.

या कार्यक्रमासाठी भारत विकास परिषदेचे (शाखा – पनवेल) खालील सदस्य उपस्थित होते.

डॉ. किर्ती समुद्रे – भारत विकास परिषदेचे महिला संयोजक प्रांत, डॉ. शिल्पा गोडबोले भारत विकास परिषदेचे महिला संयोजक पनवेल शाखा, शिरीष गडकरी– सेवा प्रमुख, गिरीश समुद्रे– प्रांत संपर्क प्रमुख, विनायक गोरे, उज्जवला गडकरी– GVCA प्रमुख

भारत विकास परिषदेच्या उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक श्री. संतोष चव्हाण सर यांनी केले. तसेच या स्तुत्य उपक्रमा बद्दल त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी भारत विकास परिषदेच्या विविध उपक्रमांबद्दल माहिती देताना डॉ. शिल्पा गोडबोले यांनी या कार्यक्रमाचे औचित्य साधून त्यांनी आहिल्या बाई होळकर योजना, आस्था एक आधार स्तंभ या उपक्रमांविषय माहिती दिली.

कार्यक्रमाच्या महिला संयोजक डॉ. किर्ती समुद्रे यांनी यावेळी भारत विकास परिषदेतर्फे चालणाऱ्या विविध आरोग्य विषयक शिबीरे सुविधा यांची माहिती यावेळी दिली.

गुरूशिष्य परंपरे बद्दल माहिती देण्यात आली व मुलांना जाणिव करून देण्यासाठी शाळेतील दहा शिक्षक व विद्यार्थ्यांचे गुरू वंदन – शिष्य अभिनंदन करण्यात आले. या कार्यक्रमात इ. ८वी सर्व चे विद्यार्थ्यी सहभागी झाले होते.

डॉ. गिरीश समुद्रे यांनी आपल्या भाषणामध्ये गुरूचे महत्व विशद करत मुलांनी दर सोमवारी आपल्या गुरूवर्यांचे चरण स्पर्श करून त्यांचा आशिर्वाद घ्यावा. असे सांगितले.

भारत विकास परिषदेतर्फे विद्यालयातील खालील शिक्षकांचे पुष्प गुच्छ देवून सत्कार करण्यात आला. श्री. संतोष चव्हाण सर (मुख्याध्यापक), सौ निरिजा अदुरी (पर्यवेक्षिका), सौ. निलिमा शिंदे (इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका), सौ वैशाली पारधी (इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभाग पर्यवेक्षिका) सौ. शशिकला पाटील (हिंदी शिक्षिका), श्री. अशोक पाटील (शा.शि. शिक्षक), सौ. प्राची इसे (विज्ञान शिक्षिका), सौ. वैशाली लाऊत्रे (विज्ञान शिक्षिका), सौ. सरोज जितेकर (इंग्रजी शिक्षिका), सौ. मंजुषा भगत (गणित शिक्षिका), सौ. पूर्वा खेडेकर (इंग्रजी शिक्षिका), श्री. महेश पोपेटा (कला शिक्षक), शिक्षक पालक संघाचे प्रतिनिधी सौ. उज्वला वाघमारे, सौ. निलम तारी, श्री. धम्मानंद वाघमारे यांचेही पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षिका सौ. पूर्वा खेडेकर यांनी केले. सौ. शिल्पा गोडबोले मॅडम यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता शाळेतील संगीत शिक्षक श्री. रूपेश मढवी व श्री. संतोष खैरे यांच्या वंदे मातरम गायनाने करण्यात आली.